**CNR No. MHLA05-000127-2019**



# नि.क्र.०८ वर आदेश

(दिनांक ०७.०४.२०२१)

ऋणको क्रं.३ यांनी सदरचा अर्ज त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर घेण्याकरिता परवानगी मिळण्याकरीता सादर केला आहे. ऋणको क्रं.३ यांनी त्यांच्या अर्जात असे नमुद केले आहे की, ऋणको क्रं.३ यांना त्यांच्या वतीने अधिवक्ता नेमणुकीचे आदेश त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झाले नव्हते म्हणून ते सदरच्या प्रकरणात हजर होवू शकले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला. पुढे त्यांनी त्यांच्या अर्जात अशी विनंती केली आहे की, ऋणको क्रं.३ यांच्याविरुध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

२. ऋणको क्रं.३ हे विहित कालावधीत सदरच्या प्रकरणात हजर न झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला होता. ऋणको क्रं.३ यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेले कारण जर ग्राह्य धरून व न्यायदानाच्या दृष्टीकोनातून सदरचा अर्ज मंजूर केल्यास धनको यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. ऋणको क्रं.३ यांच्याविरुध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर घेतल्यास धनको व ऋणको यांच्यात असलेला मूळ वाद हा न्यायालयासमक्ष येईल व सदरचे प्रकरण हे निकाली काढताना न्यायालयास मदत होईल. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. ऋणको क्रं.३ यांच्याविरुध्द दि.०२.०१.२०२० रोजी पारीत केलेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर घेण्यात येते.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

स्वाक्षरीत/–
(अ.रा. सुर्वे.)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.

अहमदपूर.
दिनांकः– ०७.०४.२०२१.